# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या
# नियामक मंडळाची ३२ वी बैठक
# दिनांक : २८/११/२००७

## - बैठकीत मान्य झालेले ठराव -


विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,

नागपूर - ४४० ००५

(महाराष्ट्र शासन अंगीकृत उपक्रम)

अधिकाऱ्यांची नांवे कार्यकारी संचालक यांनी शासनास कळवावी व त्यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करावी असे ठरले.

विषय क्रमांक ८ -

**"लोअर वणा प्रकल्प मौजा खुर्सापार ता. उमरेड जिल्हा नागपूर येथील अतिरिक्त असलेली पडीत जमीन पूर्ती सिंचन कल्याणकारी संस्था, वर्धा या संस्थेला लीजवर देण्याबाबत."**

निम्न वणा प्रकल्पांतर्गत मौजा खुर्सापार ता. उमरेड जिल्हा नागपूर येथील अतिरिक्त असलेली ५.३६ हे. जमीन जेम्स ऑफ इंडिया, नागपूर या संस्थेस लीजवर देण्याचे दृष्टीने आवश्यक त्या कायदेशीर बाबी तपासून आवश्यक कार्यवाही करण्यास नियामक मंडळाचे दि. २०.१०.०५ रोजी झालेल्या २३ व्या बैठकीत मान्यता प्राप्त झाली आहे. परंतु सदर संस्थेला उक्त जागेच्या संदर्भात काही अडचणी असल्यामुळे उक्त जागा परत घ्यावी अशी विनंती केली आहे.

नियामक मंडळाचे याच म्हणजे २३ व्या बैठकीतील ठराव क्र.२३/२ नुसार पुर्ती सिंचन कल्याणकारी संस्था, वर्धा या संस्थेस उपरोक्त जमिनीस लागून असलेल्या ३१.५९ हे. जमीन लीजवर देण्याच्या प्रस्तावास मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यामुळे उपरोक्त ५.३६ हे. जमीन पुर्ती सिंचन कल्याणकारी संस्था, वर्धा यांना विशेष बाब म्हणून लीजवर देण्याची विनंती मा.श्री. नितीन गडकरी यांनी संदर्भिय पत्रान्वये केलेली आहे. ५.३६ हे. जमिन लिजवर देण्याचे प्रस्तावास या आधीच नियामक मंडळाकडून मान्यता प्रदान झाली असल्यामुळे त्या अनुषंगाने उचित करारनामा करुन जेम्स ऑफ इंडिया, नागपूर या संस्थेस दिलेली ५.३६ हे. जमीन आता पूर्ती सिंचन कल्याणकारी संस्था, वर्धा यांना विशेष बाब म्हणून सर्व कायदेशीर बाबी तपासून लीजवर देण्याचे प्रस्तावास नियामक मंडळाची मान्यता देण्याबाबत सर्वानुमते ठरले.

९२.३७

३१.५९
५.३६
३६.९

(अजित पवार)
मा.मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष

( दे. प. शिर्के)
कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

(५) ठराव क्रमांक ३२/८ :-

''ठराव करण्यात येतो की, निम्न वेणा प्रकल्पांतर्गत मौजे खुर्सापार ता.उमरेड, जि. नागपूर येथील महामंडळास सध्या न लागणारी ५.३६ हे. जमीन, जी जेम्स ऑफ इंडिया, नागपूर यांना लीजवर देण्याचे नियामक मंडळाच्या २३ व्या बैठकीत ठरले होते, ती त्यांना लागत नसल्याने त्यांच्याऐवजी पूर्ती कल्याणकारी संस्था, वर्धा यांना महामंडळातर्फे कायदेशिर बाबी तपासून लीजवर देण्यास मान्यता देण्यात येत आहे.''

(अजित पवार)
मा.मंत्री, जलसंपदा व अध्यक्ष

( दे. प. शिर्के)
कार्यकारी संचालक व सदस्य सचिव

ANNEXURE –

पुर्ती सिंचन समृध्दी कल्याणकारी संस्था,वर्धा या संस्थेस लिजवर देण्यात येणा--या जागेच्या खसरा निहाय ( जुने भुमापन क्र.नुसार) तपशिल

मौजा— खुर्सापार

| खसरा क्रमांक | एकुण आराजी हे.आर. | धरणाची कामाकरीता उपयोगात असलेली जमीन हे.आर | पुर्ती सिंचन कल्याणकारी संस्थेस देण्यात येणारी शिल्लक जमीन हे.आर. |
|---|---|---|---|
| ५२ | १.५० | १.१५२ | ०.३४८ |
| ५४ | ४.३२ | १.०१२ | ३.३०८ |
| ५५ | ५.६५ | ३.९५ | १.७० |
| एकुण | ११.४७ | ६.११४ | ५.३६ |